॥ सा विद्या या विमुक्तये ॥

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड - ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grad

Fax : (02462) 215572 **NATIONAL SERVICE SCHEME DEPARTMENT** website: srtmun.ac.in

Phone: (02462) 215246 E-mail: nss@srtmun.ac.in

जा.क्र. : रासेयो/२०२३–२४/४१९ दिनांक १९/१०/२०२३

**परिपत्रक**

प्रति,
मा. प्राचार्य/रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी,
रा.से.यो. राबविणारी खालील संलग्नीत सर्व महाविद्यालये,
प्रस्तुत विद्यापीठ.

विषय: दिनांक १९/१०/२०२३ रोजी दुपारी ४:०० वाजता मा. पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्घाटन होणा–या प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास केंद्राच्या उद्घाटन सोहळयात सहभागी होणे बाबत.

संदर्भ: सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांचे जा.क्र विकाछसं/शिक्षण/२०२३/ ३६६७, दिनांक १६ ऑक्टोबर २०२३

महोदय,

उपरोक्त विषयी संदर्भिय पत्रान्वये सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी राज्य शासनामार्फत राबविण्यात येणारी प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास केंद्र ही संकल्पना राज्यातील तरूणांच्या रोजगार संधीसाठी आणि ग्रामीण भागाच्या विकासाला चालना देणारी असून ग्रामीण भागातील तरूणांच्या रोजगार संधी आणि त्यांना स्वावलंबी करण्याला प्राधान्य देण्यासाठी सदर योजना करण्यात आलेली आहे. राज्यातील एकूण ५११ प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास केंद्राचे उद्घाटन भारताचे माननीय पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते गुरूवार १९ ऑक्टोबर २०२३ रोजी दुपारी ४:०० वाजता ऑनलाईन पध्दतीने होणार आहे. तरूणांच्या रोजगार संधी आणि ग्रामीण भागाच्या विकासाला चालना देणारे हे महत्वाचे पाऊल आहे. त्यामुळे या केंद्राची माहिती या उद्घाटन सोहळयाच्या माध्यमातून व्यावसायिक अभासक्रमाच्या विद्यार्थ्यांपर्यंत पोहचणार आहे. सदर सोहळा **दिनांक १९/१०/२०२३ रोजी दुपारी ठीक ४:०० वाजता** सुरू होणार असून तो https://www.youtube.com/live/lBsVAE13nL8?si=PaPx4ngron9aFl4R या लिंकवर उपलब्ध आहे असे कळविले आहे.

तरी त्या अनुषंगाने रा.से.यो. संलग्नित सर्व महाविद्यालयांना सुचित करण्यात येते की, आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना **आज दिनांक १९/१०/२०२३ रोजी दुपारी ठीक ४:०० वाजता** मा. पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणा–या प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास केंद्राच्या उद्घाटन सोहळयात सहभागी होण्याबाबत उपरोक्त लिंक वर सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करावे, ही विनंती.

डॉ. मल्लिकार्जुन करजगी
संचालक
राष्ट्रीय सेवा योजना विभाग

**प्रत माहितीस्तव:**

१) मा. कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
२) मा. प्र.कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
३) मा. कुलसचिवांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
४) मा.जनसंपर्क अधिकारी, जनसंपर्क कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.

**प्रत माहिती तथा कार्यवाहिस्तव:**

१) सिस्टीम एक्सपर्ट, संगणक कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ, यांना प्रत देवून कळविण्यात येते की, सदरील परिपत्रक विद्यापीठाच्या व रा.से.यो विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे, ही विनंती.